# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.03.2026** **वारःबुधवार**

---

•पश्चिम आशियातील संघर्षाच्या काळात देशवासियांमध्ये संयम आणि एकजूट आवश्यक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन; अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशीही साधला संवाद

•भोंदूबाबा अशोक खरात विरोधात आठ गुन्हे दाखल, करचुकवेगिरीची चौकशी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत निवेदन

•हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मीयांनाच अनुसूचित जाती-जमातीचा दर्जा मिळू शकेल - सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा

आणि

•हवामानाचा अचूक अंदाज वर्तवण्याच्या दृष्टीनं पुणे वेधशाळेचं महत्त्वाचं पाऊल

**<u>पंतप्रधान-राज्यसभा</u>**

पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या आव्हानाचा सामना करण्यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याची ग्वाही, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. पश्चिम आशियातील संघर्षाबाबत काल त्यांनी राज्यसभेत निवेदन दिलं. या संघर्षाचे परिणाम दीर्घकाळ राहण्याची शक्यता असून, या काळात देशवासियांचा संयम, दृढनिश्चय आणि एकजूट आवश्यक असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

**<u>मोदी-ट्रम्प</u>**

दरम्यान पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा झाली. या भागातील तणाव कमी करून लवकरात लवकर शांतता प्रस्थापित करण्यावर भारताचा भर आहे; होर्मुझची सामुद्रधुनी खुली, सुरक्षित आणि सर्वांसाठी उपलब्ध राहणं जगासाठी अत्यावश्यक असल्याचं यावेळी अधोरेखित करण्यात आलं, असं पंतप्रधानांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**विधिमंडळ**

नाशिकमधल्या भोंदूबाबा अशोक खरातविरोधात ८ गुन्हे दाखल असून त्यातल्या ७ गुन्ह्यांचा तपास, विशेष तपास पथकामार्फत सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिली. भोंदुगिरी, जादूटोणा, तंत्रमंत्र करत त्यानं अनेक महिलांचं लैंगिक शोषण केल्याचं उघड झाल्याचं त्यांनी सांगितलं. खरातच्या मालमत्तेचं बाजारमूल्य सुमारे ४१ कोटी रुपये आहे. याप्रकरणी करचुकवेगिरीचा तपास करण्यासाठी प्राप्ती कर विभागाला कळवणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. याप्रकरणातल्या पीडितांचे समाज माध्यमांवरचे फोटो, व्हिडीओ काढून टाकण्याची कार्यवाही सुरू आहे, असं ते म्हणाले .....

दरम्यान, नाशिकच्या न्यायालयानं खरात याची पोलिस कोठडी आणखी पाच दिवसांनी वाढवली आहे.

राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि अनुदानित शाळांचं ऑडिट केलं जाणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काल विधानसभेत दिली.

महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक २०२६ काल विधानसभेत मंजूर झालं.

जादा परताव्याचं अमिष दाखवून फसवणूक केलेल्या प्रकरणांचा निकाल सहा महिन्यात दिला जावा याकरता कायद्यात बदल करण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

विधानपरिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ मे महिन्यात संपणार असून उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, राजेश राठोड, संदीप जोशी, रणजीतसिंह मोहिते पाटील आणि संजय केनेकर यांना काल सभागृहात निरोप देण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचा प्रस्ताव मांडला. राजकारणात मतभेद असतात, वेगवेगळ्या भूमिका असतात, पण यापलीकडचं नातंही असतं, ते म्हणजे सहप्रवासाचं, अशा भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सदस्यांना शुभेच्छा दिल्या.

**सर्वोच्चन्यायालय**

हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माची अनुयायी असणारी व्यक्तीच अनुसूचित जाती आणि जमाती दर्जासाठी दावा करू शकेल, असा निवाडा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. ख्रिस्ती धर्मासारख्या इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर करणाऱ्या व्यक्तिचा अनुसूचित जाती दर्जा रद्द होईल, या तीन धर्मांव्यतिरिक्त इतर धर्मांत धर्मांतर केलेली कोणतीही

व्यक्ती अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन झाल्याचा दावा करू शकत नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे. आंध्र प्रदेशातल्या एका ख्रिस्ती धर्मगुरूनं केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठानं हा निवाडा दिला आहे.

**<u>रेल्वे</u>**

भारतीय रेल्वेनं आरक्षित तिकीट रद्द करण्याच्या नियमात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता, प्रवासाला ८ तास शिल्लक असताना रेल्वेचं तिकिट रद्द केलं, तर कुठलाही परतावा मिळणार नाही. प्रवास सुरू होण्याच्या अर्धा तास आधीपर्यंत प्रवास सुरू करण्याचं ठिकाण बदलण्याची सुविधा रेल्वेनं आता उपलब्ध करून दिली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**<u>राजमाताजिजाऊ</u>**

एसटी महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज ‘राजमाता जिजाऊ’ या बस काल दाखल झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत विधान भवनाच्या प्रांगणात या नव्या बस सेवेचं लोकार्पण करण्यात आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे 3 हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्यानं दाखल होणार आहेत.

**<u>हवामानअंदाज</u>**

हवामानाचा अचूक अंदाज वर्तवण्याच्या दृष्टीनं पुणे वेधशाळेनं महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे. यापूर्वी दर तीन तासांनी दिला जाणारा हवामानाचा अंदाज आता दर मिनिटाला वर्तवणे शक्य होणार आहे. गेल्या अनेक महिन्यांच्या अथक संशोधनानंतर भारतीय वेधशाळेने अचूक हवामान अंदाज वर्तवणारी प्रणाली विकसित केली असून जागतिक हवामान दिनी या प्रणालीचा प्रारंभ पुणे वेधशाळेत करण्यात आला. पुणे वेधशाळेतील ज्येष्ठ वैज्ञानिक डॉक्टर एस. डी.सानप यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली....

**<u>क्षयरोग</u>**

जागतिक क्षयरोग निर्मुलन दिनानिमित्त काल राज्यात ठिकठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. धुळे, यवतमाळ, बीड, रत्नागिरीसह अनेक शहरांमध्ये क्षयरोग जनजागृती फेरी, क्षयरुग्णांना पोषण आहाराच्या पाकिटांचं वाटप आणि आरोग्य तपासणी यासारखे उपक्रम घेण्यात आले.

हापूस आंबा आणि काजू या रत्नागिरी जिल्ह्यातल्या अत्यंत महत्त्वाच्या पिकांच्या उत्पादनात यंदा हवामानातल्या बदलांमुळे मोठी घट अपेक्षित आहे. हापूसचं उत्पादन ८० ते ९० टक्क्यांनी, तर काजूच्या उत्पादनात ४० ते ५० टक्क्यांनी घट होणार असल्याचं कृषी विभागाच्या अहवालात म्हटलं आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी संयुक्तपणे केलेल्या पाहणीनंतर हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. दीर्घ काळ राहिलेली थंडी आणि तापमानात सतत झालेली घट यामुळे आंब्याच्या मोहोरातल्या नर फुलांचं प्रमाण वाढलं. अवकाळी पाऊसही झाला. परागीभवनातल्या अडथळ्यांमुळे फळधारणा झाली नाही. पहिल्या मोहोराची गळही मोठ्या प्रमाणात झाली आणि आता पुन्हा मोहोर येत आहे. फळमाशी, तुडतुड्यांचा प्रादुर्भावही आहे. थंडी आणि दवामुळे काजूचा मोहोरही सुकून गेला आहे. या प्रतिकूल हवामानाचा परिणाम या दोन्ही पिकांच्या गुणवत्तेवरही झाला आहे. याचा परिणाम पुरवठा साखळीवरही होणार असून, गेल्या काही वर्षांतलं हे मोठं संकट मानलं जात आहे.

## <u>हवामान</u>

दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ४०-५० किमी प्रति तास वेगानं वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक भागांत उष्ण आणि दमट हवामान राहील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**